**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७३ वा | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# जिल्हा परिषदेवर भाजपची पहिल्यादांच एकहाती सत्ता

## माळशिरस वगळता अन्य पंचायत समितीतही महायुतीच






**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेवर पहिल्यादांच भाजपने एकहाती सत्ता काबीज केली. पंचायत समितीच्या निवडणूकीत माळशिरस तालुका वगळता अन्य तालुक्यात भाजप महायुतीची सत्ता आली यापूर्वी २०१७ च्या निवडणूकीनंतर भाजपची स्थानिक आधाडीसोबत सत्ता होती. या निवडणूकीत पहिल्यांदाच भाजपने स्वबळावर जिल्हा परिषदेवर झेंडा फडकाविला आहे.

करमाळा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत भाजप महायुतीने सत्ता काबीज केली. या तालुक्यातील ६ गटाच्या निवडणूकीत भाजप २, राष्ट्रवादी अजित पवार गट २ तर स्थानिक विकास आघाडीने २ जागा मिळवले. माढा तालुक्यात भाजपने ७ पैकी ४ जागावर विजय मिळविला. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने २, शिंदेसेनेने १ गटात यश संपादन केले. त्यामुळे या तालुक्यात शिंदे बंधू यांचे वर्चस्व दिसुन आले.

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत भाजपने एकहाती सत्ता काबीज केली. या तालुक्यातील सर्व ६ गटात १२ गणात भाजपने यश मिळविले. माजी आमदार राजेंद्र राउत यांच्या नेतृत्वाखाली या तालुक्यात भाजपला यश आले भाजपविरोधात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, दोन्ही शिवसेनेनी आव्हान दिले होते. उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडणूकीत

(पान 2 वर..)

**फायनल निकाल..**
**जाहीर निकाल 68**
भाजप 38, शिंदे सेना 08, एनसीपी अजितदादा- 10, सांगोला शेकापा आघाडी 03, शरद पवार 06, करमाळा आघाडी 02, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आघाडी 01, उद्धवसेना -0, काँग्रेस- 0





## 'भारतावर बॉम्ब टाकणाऱ्याचा मुलगा सरसंघचालकांसोबत!'

### आरएसएसच्या कार्यक्रमावरून संजय राऊतांचा भाजप-संघावर घणाघात



**मुंबई (कटूसत्य वृत्त):** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) शताब्दी वर्षानिमित्त मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला असून, या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक अदनान सामी यांच्या उपस्थितीवरून शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी संघ आणि भाजपवर जोरदार टीका केली आहे. संघाच्या तथाकथित राष्ट्रभक्तीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत राऊत यांनी तीव्र शब्दांत आपला संताप व्यक्त केला आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संजय राऊत म्हणाले की, 'अदनान सामी सरसंघचालकांसोबत बसून नाश्ता करतो, हे पाहून मला धक्का बसला. ज्यांनी त्याला निमंत्रण दिले, त्यांना कदाचित माहिती नसेल की अदनान सामीचे वडील अर्शद खान हे पाकिस्तानच्या हवाई दलात होते. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी भारतावर बॉम्बहल्ले केले होते. पठाणकोट एअरबेसवर बॉम्बिंग करण्यात त्यांचा सहभाग होता. अशा व्यक्तीचा मुलगा आज सरसंघचालकांच्या बंगल्यात बसतो, हे कोणत्या राष्ट्रवादाचे लक्षण आहे?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या मुद्द्यावरून बोलताना संजय राऊत यांनी संघ व भाजपला ढोंगी आणि पाखंडी ठरवत थेट टीका केली. 'तुम्ही देशाला कोणते इतिहासाचे धडे देत आहात? ज्यांच्या पूर्वजांनी भारतावर हल्ले केले, त्यांच्यासोबत तुम्ही सन्मानाने बसत आहात. यातून तुमचे बिघडलेले चारित्र्य स्पष्ट होते,' असे कठोर शब्द त्यांनी वापरले.

याचवेळी राऊत यांनी भाजपच्या सत्ताकाळावरही हल्लाबोल केला. 'भाजप आणि संघ हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. संघाच्या पाठबळावर भाजपला सत्तेचे 'अच्छे दिन' मिळाले, मात्र त्या सत्तेमुळे देशातील सर्वसामान्यांची सुबत्ता संपली आहे. आज भारत अमेरिकेचा गुलाम झाला आहे. याची नैतिक जबाबदारी सरसंघचालकांनी स्वीकारली पाहिजे,' असा आरोपही त्यांनी केला.

या कार्यक्रमात अदनान सामींसोबतच काही अशा व्यक्तींची उपस्थिती होती, ज्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप आहेत, असा दावा करत राऊत यांनी, 'संघ आता पापावर पांघरुण घालण्याचे काम करत आहे का?' असा थेट सवाल उपस्थित केला.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा भव्य कार्यक्रम मुंबईत पार पडला. या कार्यक्रमाला सरसंघचालक मोहन भागवत प्रमुख उपस्थित होते. तसेच राजकीय नेते, बॉलिवूडमधील नामवंत कलाकार, शास्त्रज्ञ, उद्योगपती आणि सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी हजेरी लावली होती. संघाने गेल्या शंभर वर्षांतील कार्याचा आढावा घेणे आणि भविष्यातील वाटचालीवर चर्चा करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

मात्र, या कार्यक्रमातील पाहुण्यांच्या उपस्थितीमुळे निर्माण झालेल्या वादामुळे संघाच्या शताब्दी सोहळ्यावर राजकीय टीकेची सावली पसरली असून, या मुद्द्यावर पुढील राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.






## शरद पवार यांच्यावर पुण्यात उपचार सुरू

### हॉस्पिटलमध्ये गर्दी करू नये - रोहित पवार



**पुणे (कटूसत्य वृत्त) :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रमुख खासदार शरद पवार यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याने त्यांना बारामती येथून तातडीने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कफ झाल्यामुळे श्वसनास त्रास जाणवत असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

रुग्णालयात दाखल झाल्यानंतर शरद पवार यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबातील सदस्य तसेच आमदार रोहित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधत शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

रोहित पवार यांनी सांगितले की, शरद पवार हे आयसीयूमध्ये नसून खासगी खोलीत डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली उपचार घेत आहेत. 'सध्या चिंतेचे कोणतेही कारण नाही. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे उपचार सुरू आहेत. मी स्वतः त्यांच्याशी चर्चा करून आलो आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, राज्यभरातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना त्यांनी महत्त्वाचे आवाहन केले आहे. 'मी सर्वांना नम्र विनंती करतो की कोणीही शरद पवार यांना भेटण्यासाठी रुग्णालयात येऊ नये. रुग्णालयात इतरही रुग्ण आहेत. त्यांच्या उपचारांवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी सहकार्य करावे,' असे रोहित पवार यांनी सांगितले.

गेल्या १२ ते १३ दिवसांत शरद पवार यांचा शारीरिक ताण वाढला असल्याचेही त्यांनी नमूद केले. पुढील तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उपचारांबाबत निर्णय घेतला जाणार असून, एक ते दोन दिवस त्यांना रुग्णालयात ठेवले जाऊ शकते, अशी शक्यताही रोहित पवार यांनी व्यक्त केली.

दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनीही रुग्णालयाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. तपासणीचे अहवाल आल्यानंतरच शरद पवार यांच्यावर पुण्यातच उपचार सुरू ठेवायचे की पुढील उपचारांसाठी त्यांना मुंबईत हलवायचे, याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी राज्यभरातून शुभेच्छा व्यक्त केल्या जात असून, त्यांच्या आरोग्याबाबत अद्ययावत माहिती वेळोवेळी देण्यात येईल, असे पवार कुटुंबीयांनी स्पष्ट केले आहे.

## उमेश पाटील व संतोष पाटील दोन्ही बंधू पराभूत




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या मोहोळ तालुक्यात धक्कादायक निकाल समोर आला असून कुरुल जिल्हा परिषद गटातील अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांना पराभवाचा जोरदार धक्का बसला आहे. हा केवळ एकच धक्का नसून त्यांचे मोठे बंधू संतोष पाटील सुद्धा नरखेड जिल्हा परिषद गटातून पराभूत झाले आहेत. त्यामुळे मोहोळ मध्ये राजन पाटील यांचे वर्चस्व वाढल्याचे दिसून येते.

ही निवडणूक म्हणजे माजी आमदार राजन पाटील विरोधात उमेश पाटील अशीच गाजली. उमेश पाटील यांच्या बाजूने आमदार राजू खरे होते. वैयक्तिक पातळीवर निवडणूक गेली. कुरुल मध्ये उमेश पाटील यांनी भाजप समोर चॅलेंज उभे केले होते. भारतीय जनता पार्टीने जकराया कारखान्याचे चेअरमन सचिन जाधव यांना उमेदवारी देत मैदानात उतरले होते. विकासाच्या मुद्दा ऐवजी साखर कारखान्यावर प्रचार रंगला. उमेश पाटील यांनी साखर कारखान्या बद्दल केलेले वक्तव्य त्यांना काहीशी अंगलट आले होते, त्यातच अजित पवारांचे अपघाती निधन झाल्याने उमेश पाटील यांनी मतदारांना भावनिक आव्हान केले होते पण शेवटी सचिन जाधव यांनी सुमारे १३०० च्या मतांच्या फरकाने उमेश पाटील यांचा पराभव केल्याने जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला आहे.

दुसरीकडे स्वतःचा नरखेड जिल्हा परिषद गट सोडून उमेश पाटील कुरुल मध्ये आले होते आणि नरखेड मधून त्यांनी आपले बंधू संतोष पाटील यांना शिवसेनेची उमेदवारी दिली होती. तिथून ही संतोष पाटील यांचा पराभव झाला.

उमेश पाटील यांनी राजन पाटील यांना चॅलेंज करताना तुम्ही तुमचे अनगर सोडा मी माझे नरखेड सोडतो, पराभव झाला तर राजकारण सोडेल असे वक्तव्य केले होते आता त्या वक्तव्यावर निश्चितच भाजप आणि राजन पाटील यांचे कार्यकर्ते उमेश पाटील यांना चांगलंच डीवचणार हे मात्र नक्की.







## संपादकीय

# ग्रामीण राजकारणात नवे पर्व

सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने प्रथमच एकहाती सत्ता मिळवत इतिहास घडविला आहे. माळशिरस तालुका वगळता बहुतांश पंचायत समित्यांमध्येही महायुतीचे वर्चस्व प्रस्थापित झाले असून, हा निकाल जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात निर्णायक बदल घडवणारा ठरला आहे.

२०१७ च्या निवडणुकीत भाजपला स्थानिक आघाड्यांच्या सहकार्यावर सत्ता स्थापन करावी लागली होती. मात्र यंदा स्वबळावर जिल्हा परिषद काबीज करणे म्हणजे भाजपची संघटनात्मक ताकद, स्थानिक नेतृत्व आणि मतदारांचा वाढता विश्वास याचे द्योतक मानावे लागेल.

बार्शी, उत्तर सोलापूर, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ अशा तालुक्यांत भाजपने निर्विवाद वर्चस्व मिळवले. अनेक ठिकाणी संपूर्ण गटांवर भाजपचे उमेदवार निवडून येणे ही बाब केवळ पक्षीय विजय नसून ग्रामीण मतदारांच्या मानसिकतेतील बदल सूचित करणारी आहे. विकास, स्थैर्य आणि नेतृत्व याला मतदारांनी प्राधान्य दिल्याचे या निकालातून स्पष्ट होते. माळशिरस तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने उपमुख्यमंत्री विजयासिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली वर्चस्व राखले. यामुळे अद्याप काही भागांत पारंपरिक नेतृत्वाचा प्रभाव टिकून असल्याचेही दिसून आले. मात्र संपूर्ण जिल्ह्याचा विचार करता राष्ट्रवादी, काँग्रेस व शिवसेनेला (दोन्ही गटांना) मोठा धक्का बसलेला आहे.

या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांचे पराभव झाले. जिल्हा परिषद माजी अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तसेच अनेक राजकीय घराण्यांतील उमेदवारांना जनतेने नाकारले. यामागे केवळ पक्षीय राजकारण नव्हे, तर स्थानिक पातळीवरील कामगिरीचे मूल्यमापन झाले असल्याचेही दिसते. मतदार आता आडनावांपेक्षा कार्यक्षमतेकडे अधिक लक्ष देत असल्याचा हा स्पष्ट संदेश आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर महिला उमेदवार विजयी झाल्या. शांभवी कल्याणशेट्टी यांच्यासारख्या नव्या चेहऱ्यांची भावी जिल्हाध्यक्ष म्हणून चर्चा सुरू आहे. हे चित्र ग्रामीण राजकारणातील नेतृत्व बदलाचे संकेत देणारे ठरू शकते.

हा विजय भाजपसाठी आत्मविश्वास वाढवणारा असला, तरी आता खरी कसोटी सुरू होते. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील सत्ता ही केवळ राजकीय यश न राहता, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शेतकरी प्रश्न यावर ठोस कामगिरी करून दाखवण्याची जबाबदारी आहे. जनतेने दिलेला कौल हा विश्वासाचा कौल आहे, आणि तो टिकवण्यासाठी पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन आवश्यक ठरेल.

या निकालाने स्पष्ट केले आहे की सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण एका निर्णायक वळणावर आले आहे. परंपरागत राजकीय समीकरणे बदलत असून, नव्या नेतृत्वाला संधी देण्याची मानसिकता मतदारांमध्ये वाढत आहे. पुढील विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने हा निकाल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. सत्ता मिळवणे हे यशाचे पहिले पाऊल आहे; पण त्या सत्तेचा उपयोग जनतेच्या विकासासाठी कसा केला जातो, यावरच खरे राजकीय मूल्यांकन होणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला आता केवळ राजकीय घोषणांपेक्षा प्रत्यक्ष विकासाची अपेक्षा आहे. भाजप व महायुतीपुढील खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.

# गुरु तेगबहादूर सिंग : धर्म, मानवी अधिकार रक्षण करणारे विरक्त आद्यत्मवीर...

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृतीमध्ये देश आणि धमार्साठी आणि अखंड मानव कल्याणासाठी व मानवी हक्क आणि सुरक्षेच्या रक्षणाकरिता स्वतःच्या प्राणाची ही परवा न करता आत्मबलिदान देणारे व आपल्या कर्तृत्वातून शिकवण व तत्त्वज्ञानातून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण करणारे अनेक महापुरुष जन्मास आले. भारतीय संस्कृती ही जगभरामध्ये सौदार्यपूर्ण व्यवहार करणारी आणि सर्वसमावेशकतेचा आदर्श ठेवणारे विश्वबंधुत्वाची जननी आहे.

भारताच्या मध्ययुगीन इतिहासामधील सत्ता आणि धर्म संघर्ष यातून निर्माण झालेली प्रादेशिक अस्मिता, राजवटी उदयास आल्या यातून भारतीय संस्कृतीचा समन्वयवादी दृष्टिकोन विकसित होत गेला.

मध्ययुगात भक्ती चळवळीचा प्रचार व प्रसार होत होता. उत्तर भारतामध्ये धमार्चा जीवनवादी दृष्टिकोन, निर्गुण एकेश्वरवादी विचार ,मानवता ,विवेकवाद,गुरुग्रंथसाहेब शिकवणुकीस प्रमाण मानून त्यातील उपदेशाचे गेय पद्धतीने सिमरन (स्मरण)करत धर्म आणि मानवाचे रक्षणासाठी कार्य करणारा एक विचार आचार प्रवाह म्हणजे गुरू नानक देव यांनी स्थापन केलेला शीख धर्म होय.

शीख धर्मास दहा गुरूंची उत्तुंग अशी परंपरा लाभलेली आहे. अध्यात्मिक जागृती ,नैतिक मानवी मूल्यांची जपणूक करत, ईश्वराचे निराकार स्वरूप साक्षी मानून शीख धर्मच्या गुरूंनी अविरत कार्य केले.तत्कालीन कालखंडातील मुघल सम्राटांनी या मानवतावादी शिकवणी मुळे प्रसारित होणाऱ्या शीख धर्माच्या गुरूंना प्रतिरोध केला. यासाठी त्यांनी गुरुंन बरोबरच सामान्य जनतेवर देखील अनन्वित अत्याचार, अन्याय केला. शास्त्राचा उपयोग करून कट्टरवादी विचार अधिक घट्ट करण्याचा हेका ठेवला. यास प्रत्युत्तर म्हणून पाचवे गुरु अर्जुनदेवसिंग यांनी आध्यत्मिकते बरोबर जनरक्षण आणि धर्म रक्षणावर भर दिला.त्या नंतर सहावे गुरू हरगोविदसिंग यांनी "पिरी" आणि "मिरी" या संकल्पनेतून धर्मरक्षक तलवार ही संकल्पना जनमानसात रुजवली. आद्यात्मिक रक्षणासाठी "पिरी" तलवार जणरक्षण करण्यासाठी "मिरी' तलवार ही संकल्पना रुजवली.

याच गुरू परंपरेतील एक तेजस्वी गुरु तेगबहादूर सिंग (1621-1675) हे अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. म्हणूनच इतिहासात त्यांना ह्लहिंद दी चादरह्व - म्हणजे हिंदू धमार्चे संरक्षण करणारे महान बलिदानी - असे गौरवले जाते. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि



साहित्यिक योगदान हे मध्ययुगीन भारतातील सामाजिक-धार्मिक संघर्षाचे जिवंत साक्ष्य आहे.

**गुरु तेगबहादूर सिंग यांचे पूर्वायुष्यः**

गुरु तेगबहादूर सिंग यांचा जन्म 1 एप्रिल 1621 रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु गुरु हरगोबिंद सिंग यांचे कनिष्ठ पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव शांत, अंतर्मुख आणि वैराग्यशील होता. युद्धकौशल्य, शस्त्रविद्या यांचे प्रशिक्षण त्यांनी घेतले असले तरी त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे अधिक होता. त्यांनी दीर्घ काळ ध्यान, तपस्या आणि आत्मचिंतनात घालवला. गुरु तेगबहादूर सिंग यांची वृत्ती ही विरक्त,आद्यत्मिक, वीर वृत्तीची होती.

**गुरु तेगबहादूर सिंग यांचे धार्मिक शिकवण आणि तत्त्वज्ञान व साहित्य :**

त्यांची शिकवण ही निर्गुण भक्ती परंपरेशी निगडित आहे. संसार नश्वर आहे, ईश्वर निराकार आहे, अहंकार, लोभ व मोह हे बंधनाचे मूळ आहेत, नामस्मरणातून मुक्ती प्राप्त होते हे त्यांचे मूळतत्व आहे. त्यांच्या साहित्यामधील 115 शबद श्री गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. ही रचना विविध रागांमध्ये असून त्यामध्ये वैराग्य, आत्मज्ञान आणि जीवनाची क्षणभंगुरता प्रकर्षाने आढळते.

**गुरुबानी उदाहरण :**

(शरीर, धन आणि कुटुंब - सर्व मिथ्या आहेत.)

त्यांची भाषा साधी, पण अर्थगर्भ आहे. अलंकारांपेक्षा तत्त्वज्ञानात्मक आशय त्यांच्या काव्यातप्रधान आहे.

**औरंगजेब व मुघल सत्तेशी संघर्षः**

मुघल सम्राट औरंगजेब याची धार्मिक नीति कट्टर इस्लामी होती. त्याच्या कारकिर्दीत मंदिरध्वंस, जिझिया कर आणि जबरदस्तीचे धर्मांतर वाढले.

औरंगजेबाच्या काळात हिंदूंवर, विशेषतः काश्मिरी पंडितांवर जबरदस्तीने धर्मांतर लादले जात होते.काश्मिरी पंडितांनी आपले धार्मिक स्वातंत्र्य वाचवण्यासाठी गुरु तेगबहादूर सिंग यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुढाकार घेतला.

त्या वेळी त्यांनी औरंगजेबास स्पष्ट संदेश दिला की, 'जर मला इस्लाम स्वीकारायला भाग पाडले, तरच इतरांनी धर्मांतर करावे.' औरंगजेबाला मात्र शेवटपर्यंत गुरू तेगबहादूर यांचे धर्मांतर करून त्यांना इस्लाम मध्ये परावर्तित करणे शक्य झाले नाही.

औरंगजेबाने त्यांच्या या भूमिकेस अत्यंत द्वेषाने व कट्टरतेने उत्तर दिले व त्यांच्या दोन सहकाऱ्यांबरोबरच गुरू तेगबहादूर यांची 11 नोव्हेंबर 1675 रोजी दिल्लीतील चांदणी चौकात अनन्वित अत्याचार करून क्रूर हत्या करण्यात आली.

गुरु तेगबहादूर सिंग यांचे हे बलिदान मानवी अधिकार व धार्मिक स्वतंत्र्य रक्षणासाठीचे प्रतीक आहे. त्यांचे हे बलिदान केवळ हिंदू धमार्साठी नव्हते, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी होते. म्हणूनच त्यांचे बलिदान हे 'धर्मरक्षण' या संकुचित अर्थापलीकडे जाऊन मानवी अधिकारांचे रक्षण ठरते यातून व्यापक अशी असलेली 'हिंद दी चादर' उपाधी आणि संकल्पना समाजात रुढ झाली.

**धर्मरक्षण व मानवी अधिकारांचे संरक्षण**

गुरु तेगबहादूर सिंग यांचे बलिदानाने "हिंद दी चादर" ही संकल्पना हे इतिहासातील मानवी अधिकारांसाठी दिलेले पहिले संघटित बलिदान मानले जाते. त्यांनी धर्म म्हणजे केवळ पूजा-पद्धती नव्हे, तर स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि विवेक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांचा विचार आधुनिक 'Right to Freedom of Religion' या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

**समकालीन प्रस्तुतता**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात धार्मिक असहिष्णुता, मुलतत्ववाद आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन वाढताना दिसते. अशा वेळी गुरु तेगबहादूर सिंग यांचे विचार अधिकच समकालीन ठरतात. त्यांचे जीवन हे धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि नैतिक धैर्य यांचे आदर्श उदाहरण आहे. त्यांच्या प्रेरणेतू त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. आजही शीख समाजात त्यांचे बलिदान न्याय व सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देते.

गुरु तेगबहादूर सिंग हे केवळ शीख धमार्चे गुरु नव्हते, तर मानवतेचे महान रक्षक होते. 'हिंद दी चादर' म्हणून त्यांचे बलिदान आजही धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांचे सर्वोच्च प्रतीक आहे. त्यांचे तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे भारतीय संतपरंपरेतील अमूल्य वारसा असून, समकालीन समाजासाठी ते सदैव प्रेरणादायी राहील.

**डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर**
विभाग प्रमुख,
प्राचीन भारतीय इतिहास,
संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ सोलापूर
मोबा.: 9922520985
prabhakarkolekar@gmail.com

पान १ वरून

## जिल्हा परिषदेवर भाजपची पहिल्यादांच...

भाजपने एकहाती सत्ता काबीज केली. या तालुक्यातील तिन्ही गटावर भाजपचे उमेदवार विजयी झाले. मोहोळ तालुक्यातील निवडणूकीत माजी आमदार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपने यश संपादन केले. या तालुक्यातील ६ गटापैकी भाजप ४, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार १ तर शिंदेसेनेने १ गटात विजय मिळविला.

माळशिरस तालुक्यातील निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील पांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने यश संपादन केले.या तालुक्यातील ९ पैकी ८ गटावर राष्ट्रवादीने तर एका गटात भाजपने यश संपादन केले. पंचायत समितीतही राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी यश मिळविले. सांगोला तालुक्यातील निवडणूकीत महायुतीच्या उमेदवारांनी यश संपादन केले. या तालुक्यात ७ गटापैकी शिंदसेनेस १, स्थानिक आघाडीस २, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटास १ तर महायुतीस एका ठिकाणी यश मिळाले.

मंगळवेढा तालुक्यातील सर्व चारही गटात व आठ गणात भाजपच्या उमेदवारांनी यश संपादन केले. त्यामुळे या तालुक्यात आ. समाधान आवताडे यांचे वर्चस्व स्पष्ट दिसून आले. दक्षिण सोलापूर तालुक्यातही भाजपने मोठे यश संपादन केले. सहा गटापैकी ५ ठिकाणी भाजप तर एका ठिकाणी शिंदेसेनेने यश संपादन केले. पंचायत समितीतही भाजपने पुन्हा सत्ता काबीज केली.

अक्कलकोट तालुक्यातील निवडणूकीतही आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे वर्चस्व दिसून आले. या तालुक्यातील सहा गटापैकी चार गटात भाजप तर दोन ठिकाणी शिंदेसेनेच्या उमेदवारांनी यश संपादन केले.

पंढरपूर तालुक्यातील निवडणूकीत भाजप व राष्ट्रवादी कॉग्रेसमध्ये चांगलीच लढत झाली. याठिकाणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखालील भाजप गटास व आ.अभिजित पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीस यश मिळाले.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ जि.प. गटातून निवडणूक लढवित होते. भाजपचे उमेदवार इंद्रजित पवार यांनी साठे यांचा दारुण पराभव केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील हे मोहोळ तालुक्यातील कुरुल जि.प.गटातून निवडणूक लढवित आहेत, त्यांचाही या निवडणूकीत पराभव झाला तर त्यांचे बंधू संतोष पाटील हे नरखेड गटातून शिंदेसेनेतून निवडणूक लढवित होते. त्यांचाही याठिकाणी पराभव झाला. याठिकाणी भाजपचे उमेदवार व जकराया शुगरचे चेअरमन सचिन जाधव यांनी यश मिळविले.

जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समितीचे सभापती विजयराज डोंगरे हे पुन्हा आष्टी जि.प.गटातून जिल्हा परिषदेत निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून निवडणूक लढवित होते.

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी या चपळगाव जि.प.गटातून भाजपच्या उमेदवार होत्या. त्यांनाही या निवडणूक यश आले. जिल्हा परिषदेच्या भावी अध्यक्षा म्हणून त्यांची चर्चा होत आहे. चपळगाव गणात आ.सचिन कल्याणशेट्टी यांचे पुतणे सागर कल्याणशेट्टी ही भाजपकडून निवडणूक लढवित आहेत. त्यांनाही याठिकाणी यश आले आहे.

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत माळशिरचे आ.उत्तम जानकर यांचे चिरंजीव हे दहिगाव गटासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून निवडणूक लढवित होते. त्यांच्या विरोधात माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती या भाजपच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवित होत्या, त्यांनी जानकर यांचा पराभव केला. तर फॉडशिरस जि.प.गटातून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे अजुर्नसिंह मोहिते पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विजयी झाले.

अक्कलकोटचे माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांचे चिरंजीव शिवराज म्हेत्रे हे सलगर जि.प. गटातून शिंदेसेनेचे उमेदवार होते, त्यांना या निवडणूकीत यश आल. तर सिध्दाराम म्हेत्रे यांच्या कन्या शीतल म्हेत्रे या तोळणूर गणातून शिंदेसेनेकडून निवडणुकीस सामोरे होत्या, त्यांनाही याठिकाणी यश आले.

मोहोळचे माजी आमदार प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या कन्या कोमल या मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मीदहिवडी जि.प. गटातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून निवडणूक लढवित होत्या. त्यांचा याठिकाणी पराभव झाला.

दक्षिण सोलापूरचे माजी आमदार रतिकांत पाटील यांच्या पत्नी लक्ष्मी या हत्तूर जि.प. गटातून शिंदेसेनेच्या माध्यमातून विजयी झाल्या आहेत. विधानपरिषदेचे माजी आमदार दीपक साळुंख-पाटील यांचे चिरंजीव सुर्यादित्य हे सांगोला तालुक्यातील जवळा गटातून शिंदेसेनेसोबत जात निवडणूक लढवित होते. त्यांना याठिकाणी पराभवास सामोरे जावे लागले.

दक्षिण सोलापूरचे माजी आमदार दिलीपराव माने यांचे चिरंजीव उत्तर सोलापूर तालुक्यातील नवनिर्वाचित कोंडी जि.प. गटातून भाजपचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवित होते. काँग्रेसचे भारत जाधव यांचा पराभव त्यांनी केला. करमाळा विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार शामल बागल यांच्या कन्या रश्मी बागल या करमाळा तालुक्यातील पांडे जि.प. गटातून भाजपच्या उमेदवार म्हणून निवडणुकीस सामोरे गेल्या होत्या, याठिकाणी त्यांना यश मिळाले.

# सॅमसंग इंडियाकडून नव्या पिढीसाठी गॅलेक्सी A07 5G स्मार्टफोन लाँच




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतामधील आघाडीची ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स कंपनी सॅमसंग इंडियाने आज नव्या पिढीच्या गरजा लक्षात घेऊन सॅमसंग गॅलेक्सी A07 5G हा नवीन स्मार्टफोन अधिकृतपणे लाँच केला आहे. हा स्मार्टफोन विशेषतः तरुण ग्राहक, जनरेशन आणि डिजिटल कंटेंट क्रिएटर्ससाठी डिझाइन करण्यात आला असून, उत्कृष्ट कॅमेरा, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि वेगवान डिस्प्ले ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

गॅलेक्सी A07 5G मध्ये 50 मेगापिक्सेलचा मुख्य कॅमेरा देण्यात आला असून, यामुळे अत्यंत सुस्पष्ट आणि उच्च दर्जाचे फोटो व व्हिडिओ कॅप्चर करता येतात. सोशल मीडिया कंटेंट, व्हिडिओ रील्स आणि दैनंदिन फोटोग्राफीसाठी हा कॅमेरा उपयुक्त ठरणार आहे. यासोबतच 6000mAh क्षमतेची शक्तिशाली बॅटरी देण्यात आली असून, दिवसभर अखंड वापरासाठी ती सक्षम आहे.

सॅमसंग इंडियाच्या एमएक्स बिझनेसचे उपाध्यक्ष आदित्य बब्बर यांनी यावेळी सांगितले की, 'आजची तरुण पिढी मोठ्या प्रमाणात सोशल कंटेंट तयार करते, मोबाइल गेमिंगचा आनंद घेते आणि ऑनलाइन मनोरंजनावर अधिक वेळ घालवते. त्यांच्या या गरजा लक्षात घेऊन गॅलेक्सी A07 5G डिझाइन करण्यात आला आहे. अधिक शक्तिशाली 50टढ कॅमेरा, 6000mAh बॅटरी आणि 120Hz रिफ्रेश रेट असलेला डिस्प्ले यामुळे हा स्मार्टफोन 'मोअर ऑसम' अनुभव देतो.'

गॅलेक्सी A07 5G लाइट व्हायोलेट, लाइट ग्रीन आणि ब्लॅक या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे. फोनचे वजन सुमारे 199 ग्रॅम असून जाडी 8.2 मिमी आहे. स्लिक आयलँड 2.0 फ्लॅट साइड फ्रेममुळे फोन हातात धरताना मजबूत पकड मिळते.

या स्मार्टफोनमध्ये 6.7 इंचाचा FHD+ डिस्प्ले देण्यात आला असून 120Hz रिफ्रेश रेटमुळे व्हिडिओ पाहताना आणि वेब ब्राउझिंग करताना अतिशय स्मूथ अनुभव मिळतो. हाय ब्राइटनेस मोडमुळे (HBM) स्क्रीन 800 निट्सपर्यंत उजळ राहते, त्यामुळे प्रखर सूर्यप्रकाशातही डिस्प्ले स्पष्टपणे दिसतो.

गॅलेक्सी A07 5G चा डिस्प्ले 2-स्टेप टेम्पर्ड ग्लासने संरक्षित करण्यात आला आहे. हा स्मार्टफोन IP54 प्रमाणित असल्याने धूळ व पाण्याच्या हलक्या शिंतोड्यांपासून सुरक्षित राहतो. फोनच्या मागील बाजूस ग्लास फायबर रिइन्फोर्स्ड पॉलिमर (GFRP) मटेरियल वापरण्यात आले असून, ते मागील मॉडेल्सपेक्षा अधिक मजबूत व टिकाऊ आहे.

उत्कृष्ट कॅमेरा क्षमतेसोबतच मोठी बॅटरी, वेगवान डिस्प्ले आणि 5G कनेक्टिव्हिटी यामुळे गॅलेक्सी A07 5G हा स्मार्टफोन ऑनलाइन मनोरंजन, गेमिंग, कंटेंट क्रिएशन आणि दैनंदिन वापरासाठी एक परिपूर्ण पर्याय ठरणार असल्याचे सॅमसंगकडून सांगण्यात आले आहे.

# फडणवीसांच्या पट्ठ्याने विरोधकांचा उडवला धुव्वा

## राजेंद्र राऊतांचा बार्शीत चमत्कार





**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपला रोखण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी आणि दोन्ही शिवसेना एकत्र आल्या होत्या. दोन्ही राष्ट्रवादी आणि दोन्ही शिवसेना एकत्रित येऊन महाआघाडीची स्थापना केली होती.

दिलीप सोपल यांनी पुढाकार घेतला होता. बार्शीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत माजी आमदार राजेंद्र राऊत आणि विद्यमान आमदार दिलीप सोपल अशी मुख्य लढत दिसून आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजेंद्र राऊत यांना पाठबळ देत भाजपला स्वबळावर लढण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसंच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महाआघाडीविरोधात जोरदार प्रचार केला होता. या पार्श्वभूमीवर राजेंद्र राऊत यांनी विरोधकांचा धुव्वा उडवत बाशीर्तील 6 जिल्हा परिषद गट आणि 12 पंचायत समितीवर निर्विवाद विजय मिळवला आहे.

बार्शी तालुक्यात एकूण सहा जिल्हा परिषद गट आणि 12 पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला होता. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्याकडे भाजपच्या सर्व उमेदवारांना निवडूण आणण्याची जबाबदारी होती. या निवडणुकीत दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादीवर भारी पडत भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे.

**बार्शीत भाजपविरोधात महाआघाडी**

संपूर्ण राज्याचं बार्शीच्या निकालाकडे लक्ष लागले होतं. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय बाशीर्चे भाजपचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांना शह देण्यासाठी सर्व राजकीय पक्ष एकत्र आल्याने सोलापूर जिल्ह्यात मोठी चर्चा होती.

# अत्याधुनिक पद्धतीच्या इंजिनिअरिंगने नटलेल्या या समर्थ प्रसाद प्रकल्पाचे मनापासून कौतुक - आयुक्त ओंबासे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मनपा आयुक्त सचिन ओंबासे यांनी क्रीडायच्या प्रदर्शनात समर्थ प्रसाद प्रकल्पाचे मनापासून कौतुक करून, त्यांनी अत्याधुनिक पद्धतीच्या इंजिनिअरिंगने नटलेल्या समर्थ प्रसाद या प्रकल्पाचे त्यांनी मनापासून कौतुक केले. आणि बेल वाजवून अभिनंदन केले.

सोलापुरातील नवीन आरटीओ जवळ सुरू असलेल्या जे. जे. आर. व्ही. यांच्या माध्यमातून तयार होणाऱ्या समर्थ प्रसाद प्रकल्पाचे प्रमुख विवेक दीक्षित जी यांचा सन्मान करताना सचिन उंबासे सर. ते पुढे बोलताना म्हणाले की असा प्रोजेक्ट सोलापुरात येणे म्हणजे अभिमानास्पद आहे. कारण देशभरातील नावाजलेल्या इंजिनिअरिंगच्या माध्यमातून समर्थ प्रसाद प्रकल्पाचे प्रोजेक्ट तयार होणार आहे. या प्रकल्पात फ्लॅट असणे म्हणजे नागरिकांसाठी गौरवास्पद असल्याचे स्पष्ट केले.

धन्यवाद सोलापूरकर आणि क्रीडाई तसेच आदरणीय सोमा पाचे आयुक्त सचिन ओंबासे सर यांचे मनापासून आभार त्यांनी वेळ काढून आमच्या स्टॉलला भेट दिली आणि आमच्या प्रकल्पाचे कौतुक केला आम्हाला प्रोत्साहन दिला त्यामुळे आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो.

अशा या अत्याधुनिक पद्धतीने आणि जागतिक आर्किटेक ने नटलेल्या समर्थ प्रसाद प्रकल्पाला सहकुटुंब एक वेळा अवश्य भेट द्यावे असे आवाहन विवेक दीक्षित परिवाराने केले आहे.



## वात्रटिका

### निवडणूक करामती

कुठे निकाल लागले
कुठे निकाल लावले...
कोण मार्क घेऊन गेले
तर कोण काठावर आले...
घरातील लाडोबा कोणी
मतदान केंद्रात घेऊन आले...
करामत करून लाडोबा गेले
आणि अधिकाऱ्याला भोवले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्वामी कृपेने लाभलेले व जनतेने दिलेले कौलामुळे लाभलेले महापौरपदाचा कार्यकाल लोकसेवेसाठी समर्पित - महापौर कोंड्याल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वामी कृपेने लाभलेले व जनतेने दिलेले विजयी कौल मान्य करून लाभलेल्या महापौरपदाचा कार्यकाल लोकसेवेसाठी समर्पित असल्याचे मनोगत भारतीय जनता पाटीर्चे सोलापूर महापालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केले. आज येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास नुतन महापौर विनायक कोंड्याल यांनी सहकुटूंब भेट देवून श्री स्वामी समर्थाचे दर्शन घेतले. यावेळी



मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा भारतीय जनता पाटीर्चे नगरसेवक महेश इंगळे यांनी महापौर विनायक कोंड्याल यांचा श्री स्वामी समर्थाचे कृपावस्त्र, प्रसाद देवून सपत्निक व सहकुटूंब यथोचित सत्कार केला. यावेळी महापौर कोंड्याल बोलत होते. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, समर्थ नगर ग्रामपंचायतचे प्रदीप पाटील, श्रीकांत मलवे, विपूल जाधव व अन्य उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवाच्या तयारीसाठी महापौरांना निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** येत्या १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्याच्या पार्श्वभूमीवर, शहरातील विविध ठिकाणी असलेल्या शिवपुतळ्यांची अर्धवट कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, तसेच उत्सवाच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ ट्रस्टच्या वतीने नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अश्वारूढ पुतळा, तसेच डाळिंब आड - इंदिरा कन्या प्रशाला लगत शिंदे चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरातील सर्व प्रलंबित व अर्धवट कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. जयंतीच्या दिवशी कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी ही कामे वेळेत मार्गी



लावावीत, असे ट्रस्टच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

डाळिंब आड परिसरात मनपाकडून दरवर्षीप्रमाणे मैदानाची साफसफाई, मंडप उभारणी, रोलिंग, मलमा टाकणे, रंगरंगोटी, प्रकाशयोजना, कुस्तीचा आखाडा तयार करणे तसेच प्रेक्षकांसाठी गॅलरी उभारण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी सविस्तर मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच डाळिंब आड येथील मूर्ती व छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास सकाळ व संध्याकाळ पूजेची नियमित व्यवस्था, शिवमंदिराची प्रकाशयोजना, परिसराची स्वच्छता आदी कामे त्वरित करण्यात यावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. अश्वारूढ पुतळ्यासमोर स्टेज उभारणे, त्यावर मॅटिंग, महिलांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था, चबुतरा व पुतळ्याच्या परिसरात फुलांची सजावट, पाळणा कार्यक्रमासाठी लाईटिंग व ध्वनिक्षेपक, सत्कारासाठी स्वतंत्र स्टेज, स्क्रीनची व्यवस्था तसेच छायाचित्रकारांसाठी स्टेज उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात नमूद आहे.

याशिवाय मेघडंबरी चौकाच्या तिन्ही बाजूंना टॉवर उभारून फोकस लाइटची व्यवस्था, १८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पाळणा कार्यक्रमासाठी महिलांना ये-जा सुलभ व्हावी यासाठी शहरातील ठराविक मार्गावरून बसेस सोडण्याची व्यवस्था, तसेच मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी गॅलरी उभारण्याची मागणी ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे.

हे निवेदन देताना ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर (नाना) काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बचुटे-बरडे, उपाध्यक्ष किरण भंडारी, ब्रह्मदेव पवार, मिरवणूक प्रमुख विजय पूकाळे, ट्रस्टी सदस्य प्रकाश ननवरे, सचिव प्रीतम परदेशी, देविदास घुले, राजू काकडे, सुभाष पवार, नागेश वडणे, सतीश महाले, अथर्व शिंदे, प्रसिद्धीप्रमुख दीपक शेळके, कृष्णकांत चव्हाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवजन्मोत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, यासाठी महापालिकेने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ट्रस्टच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे SIPL २०२६ भव्य क्रिकेट स्पर्धा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन आयोजित रक्ढछ २०२६ भव्य क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा चिंचोळी टकळ येथील श्री धर्मराज मंदिर मैदानावर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संपूर्ण स्पर्धेदरम्यान सर्व संघांनी उत्कृष्ट खेळ, शिस्तबद्धता व क्रीडास्पर्धेची भावना जपत उल्लेखनीय सहभाग नोंदविला.




**स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे :**

विजेता संघ - आर्टिस शिलेदार : ट्रॉफी व ₹२५,०००/-

उपविजेता संघ - काकडे इलेक्ट्रिकल्स : ट्रॉफी व ₹१५,०००/-

ड्ढ सेमीफायनलिस्ट -

१) फायर ब्रिगेड चिंचोळी टकळ : ट्रॉफी व ₹५,५००/-

२) बालाजी टायटन्स : ट्रॉफी व ₹५,५००/-

**फेअर प्ले टीम - बंग सुपर किंग्ज**

उल्लेखनीय बाब म्हणजे सर्व विजेत्या संघांनी आप -आपली बक्षीसाची जिंकलेली रक्कम श्री धर्मराज मंदिरास दान स्वरूपात अर्पण केली. एकूण ₹५१,०००/- इतकी रक्कम मंदिरास देण्यात आली.

**विशेष पुरस्कार :**

- मॅन ऑफ द सिरीज - गणेश भोसले (काकडे इलेक्ट्रिकल्स) : ट्रॉफी + ₹३,०००/-
- बेस्ट बॉलर - विश्वजित भोसले (बालाजी टायटन्स) : ट्रॉफी + ₹२,०००/-
- बेस्ट बॅट्समन - गणेश भोसले (काकडे इलेक्ट्रिकल्स) : ट्रॉफी + ₹२,०००/-
- बेस्ट विकेटकीपर - नाना चव्हाण (फायर ब्रिगेड चिंचोळी) : ट्रॉफी + ₹२,०००/-
- बेस्ट फील्डर - प्रवीण वालीकर (एलएचपियन्स) : ट्रॉफी + ₹२,०००/-

या भव्य स्पर्धेसाठी लाभलेले प्रमुख प्रायोजक बालाजी अमाईन्स लिमिटेड, प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड, प्रभू रॉकशेप मशिनरी तसेच सहप्रायोजक लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रा. लि., कोयना शिलाई मशीन, स्मृती ऑर्गानिक्स, कृष्णा फॅब्रिकेशन यांचे असोसिएशनतर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा स्पर्धा समिती अध्यक्ष गणेश सुत्रावे, सहसचिव अभिषेक तापडिया, सहसचिव शिवशंकर आंधळकर व कार्यकारी सदस्य कमलेश शहा यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक शुद्धोधन गायकवाड, क्लार्क सुरेश हिटनळी, धर्मराज मंदिर समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून मनीष काळे, अनिल गायकवाड तसेच समालोचक म्हणून वीरभद्र कोळी यांनी काम पहिले.

सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत भविष्यातही अशा स्पर्धांद्वारे औद्योगिक क्षेत्रात क्रीडा संस्कृती वृद्धिंगत करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# शांती चौक हिंदू स्मशानभूमीला दुर्लक्षाचे ग्रहण

## महापालिकेच्या अनस्तेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संताप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात स्मशानभूमीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, शांती चौक येथील हिंदू स्मशानभूमी सध्या महापालिका प्रशासनाच्या अनास्थेमुळे दुरवस्थेच्या गर्तेत सापडली आहे.




मूलभूत सुविधांचा अभाव आणि पसरलेली अस्वच्छता यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना नाहक मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

प्रमुख समस्यांची जंत्री -

स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारावर साधे नावफलकही उपलब्ध नाही, ज्यामुळे नवीन व्यक्तीला ही जागा शोधणे कठीण जाते. सर्वात गंभीर बाब म्हणजे स्मशानभूमीला कोणतीही संरक्षक भिंत किंवा गेट नाही. यामुळे परिसरात मोकाट जनावरांचा वावर वाढला असून, जागेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**अस्वच्छतेचे साम्राज्य -**

स्मशानभूमी परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले असून, मोठी दुर्गंधी पसरली आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे हा परिसर रोगराईचे केंद्र बनत चालला आहे.

प्रवेशमार्गाची दुर्दशा -

नागरिकांसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक प्रवेशमार्ग नसल्याने पावसाळ्यात किंवा रात्रीच्या वेळी मोठी अडचण निर्माण होते.

**श्रद्धेचा आणि सन्मानाचा प्रश्न**

"स्मशानभूमी ही केवळ एक जागा नसून ती आपल्या संस्कृती आणि श्रद्धेशी जोडलेली आहे. एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना, अशा अस्वच्छ आणि अव्यवस्थित ठिकाणी अंत्यसंस्कार करणे अत्यंत क्लेशदायक आहे," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**नागरिकांच्या प्रमुख मागण्या**

प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखून खालील कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी जोर धरत आहेः

**काय करायला हवे ?**

- भव्य आणि स्पष्ट नावफलक लावणे.
- परिसराची तत्काळ स्वच्छता करणे.
- सुरक्षिततेसाठी मजबूत संरक्षक भिंत आणि गेट बसवणे.
- नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याची सोय करणे.

संबंधित प्रशासकीय विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन या जागेचे पावित्र्य राखावे, हीच सर्वसामान्यांची माफक अपेक्षा आहे. अन्यथा, आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


# वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या जिल्हायातील प्रथम वर्षातील विदयार्थ्यांसाठी वसतिगृह आधार व स्वयंम योजनेकरीता अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ६ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरू राहणार असल्याचे सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण गणेश सोनटक्के यांनी प्रसध्दि पत्रकान्वये कळवलिे आहे.

ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून प्रवेश प्रक्रियेचा गरजु व पात्र विदयार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी. अशा १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेण्याऱ्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय वसतिगृह/स्वयंम व आधार सन २०२५-२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे -

- प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी - दिनांक ६ फेब्रुवारी 2०२६ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०२६,
- अर्ज छाननी करावयाचा कालावधी - दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ते दि.१८ फेब्रुवारी २०२६
- पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे - दिनांक २० फेब्रुवारी २०२६
- पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत - दिनांक २६ फेब्रुवारी २०२६

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वर-वधू**

**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे।
मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर
वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**पाहिजेत**
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी सुरक्षा व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात- सचिव डॉ. परदेशी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. देशभरातून लाखो भाविक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या तयारीस गती देत सुरक्षा, पाणीपुरवठा, भोजन, निवास, वाहतूक, स्वच्छता आदी बाबींची चोख व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी यांनी दिले.

'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमांता बिस्वा सरमा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी तथा कार्यक्रमाचे समन्वयक रविंद्र राठोड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, मुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव तुषार राठोड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे कोकण, पुणे, नाशिक विभागाचे आयुक्त, मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबारचे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, परिवहन आयुक्त, महानगरपालिकेचे आयुक्त यांच्यासह संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले की, नागपूर आणि नांदेड येथील कार्यक्रम लाखो भाविकांच्या उपस्थित यशस्वीरित्या झाला आहे. या कार्यक्रमात सिख, सिकलकर,बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकी) संप्रदायासह नागरिकही मोठ्या संख्येने गुरू तेग बहादुर यांचा इतिहासाला उजाळा देण्यासाठी एकत्र येतात. नवी मुंबई येथील कार्यक्रमातही दहा लाख भाविक राज्य तसेच देशातून अपेक्षित आहेत. या अनुषंगाने वाहतुक, स्वच्छता, लंगर, पाणी पुरवठा, मैदान, धर्मशाळा, निवासव्यवस्था, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह, निःशुल्क शटल बससेवा या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांच्या शहीदीच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमाअंतर्गत शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा, शिक्षण संस्था येथे विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी काढण्यात येते, घोषवाक्य, निबंध स्पर्धा तसेच डॉक्युमेंट्री बनविण्यात येणार आहे. सतिंदर सरताज यांचे भक्तिगीत सिनेमागृहात प्रदर्शीत करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डिजिटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने, जागरण, प्रचार व प्रसार समित्या यांच्यामार्फत गुरू तेग बहादुर आणि त्यांच्या परिवाराच्या शहीदीचा इतिहास जनमानसात पोहोचविण्यात येत आहे.

https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर कार्यक्रमाची संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. नऊ समाज या कार्यक्रमाच्यानिमित्ताने एकत्र येत असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ५ | | ६ | ■ | ७ | |
| ८ | | | ■ | ९ | | | ■ | | ■ | | ■ |
| १० | | ■ | ११ | | ■ | ■ | ■ | १२ | | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | ■ | १३ | | | ■ | ■ | १४ |
| १५ | १६ | | | | १७ | | ■ | १८ | १९ | २० | |
| २१ | | ■ | ■ | ■ | २२ | | २३ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | | ■ | २९ |
| | ■ | ३० | | | ■ | ३१ | | ■ | ■ | ३२ | |
| ३३ | | | ■ | ३४ | | ■ | ३५ | ३६ | | | |
| | ■ | ३७ | ३८ | | ■ | ३९ | | | ■ | | ■ |
| ४० | ४१ | ■ | | ■ | ४२ | | | ■ | ४३ | | ४४ |
| ४५ | | | | ■ | | ■ | ■ | ४६ | | ■ | |

**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 172

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# इंद्रजीत पवार, पृथ्वीराज माने मोठ्या मताधिक्याने विजयी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे निकाल लागले आहेत अनेक ठिकाणी भारतीय जनता पार्टीने दणदणीत विजय मिळवला आहे. सोलापूर जिल्ह्यामधील सर्वांचे लक्ष लागलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यात तीनही जागा भारतीय जनता पार्टीने आपल्याकडे खेचून आणल्या आहेत. या विजयाचे किंगमेकर उत्तर तालुक्याचे नेते माजी आमदार दिलीप माने हेच मानले जात आहेत. त्यामुळे दिलीप मालक जिथे विजय तिथे अशी चर्चा कार्यकर्ते करू लागले आहे.

यंदा उत्तर सोलापूर तालुक्यात अनेक राजकीय समीकरणे बदलली महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावरच माजी आमदार दिलीप माने यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. त्यामुळे उत्तर तालुक्याचे नेते शहाजी पवार यापूर्वीच भाजपमध्ये गेलेले माजी आमदार यशवंत माने यांची या तालुक्यात ताकद वाढली. जोडीला



अविनाश मातंर्डे हे सुद्धा होते.

तालुक्यात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे हे एकमेव विरोधक दिसत होते. काका साठे यांचा पारंपारिक नान्नज जिल्हा परिषद गट हा ओबीसी साठी राखीव झाल्याने त्यांनी पहिल्यांदाच बीबीदारफळ या जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवली काका साठे यांनी या वयामध्ये निवडणूक लढवू नये अशी सुद्धा चर्चा झाली परंतु आपली शेवटची निवडणूक आहे म्हणून त्यांनी भावनिक करत ही निवडणूक लढवली. त्यांच्या विरोधात शहाजी पवार यांचे लहान बंधू इंद्रजीत पवार हे उभे राहिले.

नान्नज जिल्हा परिषद गटातून काका साठे यांनी अनिल गवळी यांना उमेदवारी दिली त्यांच्या विरोधात भारतीय जनता पार्टीच्या चैत्राली मुळे या उभ्या राहिल्या. तसेच सर्वांचे लक्ष लागलेल्या कोंडी या जिल्हा परिषद गटातून दिलीप माने यांनी आपले पुत्र पृथ्वीराज माने यांना उमेदवारी दिली पृथ्वीराज माने यांच्या विरोधात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भारत जाधव हे उभे राहिले.

उत्तर पंचायत समितीचे सभापती यंदा अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव आहे भारतीय जनता पार्टीने मार्डी गनातून तेजस्विनी बोराडे यांना उमेदवारी दिली, राष्ट्रवादी काँग्रेस कडून मात्र तळेहिप्परगा येथील काजल जगताप यांना उमेदवारी दिली. यापूर्वी सभापती राहिलेल्या रजनी भडकुंबे यांनी अपक्ष अर्ज भरला होता त्यांनी अर्ज माघार घेऊन राष्ट्रवादीच्या काजल जगताप यांना पाठिंबा दिला मुळात दिलीप माने समर्थक मानले जाणारे भडकंबे यांनी नाराज होऊन हा निर्णय घेतल्याने त्यांच्यावर टीका झाली. आता या विजयानंतर त्यांचीही राजकीय अडचण झाल्याचे दिसून येते.

नान्नज गटातून चैताली मुळे, बीबी दारफळ मधून इंद्रजीत पवार आणि कोंडीतून पृथ्वीराज माने हे तीनही भारतीय जनता पार्टीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. वडाळा पंचायत समितीचे एकमेव जागा सोडता पंचायत समितीच्या सुद्धा पाच जागा भारतीय जनता पार्टीने जिंकल्या आहेत. 85 व्या वयात पराभव झाल्याने काका साठे यांचीही अडचण झाली आहे. त्यांनी यंदा निवडणूक लढवू नये अशी अशी विनंती सुद्धा काही नेत्यांनी केली होती पण ते ऐकले नाहीत. बीबी दारफळकडे सर्व लक्ष असल्याने त्यांचा स्वतःचा हक्काचा नान्नज सुद्धा आता भाजपच्या ताब्यात गेला आहे.

एकूणच या विजयानंतर दिलीप माने यांच्या नेतृत्वाचा विजय मानला जात आहे. दिलीप माने यांना शांत संयमी शहाजी पवार तसेच माजी आमदार यशवंत माने बाजार समितीचे संचालक अविनाश मातंर्डे यांची मिळालेली सात तितकीच महत्त्वाची आहे.

# आझाद मैदानावर पाणी व स्वच्छता कर्मचारी आंदोलनावर ठाम

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** आझाद मैदानावर सुरू असलेले पाणी व स्वच्छता कर्मचारी यांचे आंदोलन दुसरे दिवशी सुरू ठेवणेत आले आहे.पाच महिने पासून वेतन व प्रलंबित प्रश्नाच्या सोडवणुकी साठी आज प्रधान सचिव पराग जैन यांचे समवेत झालेल्या बैठकीतील चर्चा सकारात्मक ठरली आहे. त्यामुळे उद्या निधी वितरण आदेश सोबत इतर लेखी आश्वासन दिलेनंतर आझाद मैदान सोडणार अशी भुमिका राज्य कृती समितीचे वतीने घेणेत आली. राज्यातील साडेचारशे पेक्षा अधिक कर्मचारी आंदोलनावर ठाम आहेत.याबाबत उद्या १० फेब्रुवारी रोजी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांचे दालनात प्रधान सचिवांची बैठक होणार आहे.

आज आझाद मैदानावर सुरू असलेले आंदोलनाचे पार्शवभुमीवर जीटी रूग्णालय परिसरातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात आज प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, जल जीवन मिशन चे सहसचिव व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) चे अभियान संचालक बी जी पवार, अतिरिक्त अभियान संचालक शेखर रौंदाळ, अवर सचिव जायकर , कक्ष अधिकारी प्रसाद स्वामी, राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी राज्य



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडून न्यायाची अपेक्षा - सचिन जाधव**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातलेने कर्मचारी यांचे मध्ये आशा निर्माण झाले आहेत. उद्या मंगळवारी प्रश्ना बाबत मुख्य सचिव यांचे कडे बैठक होत आहे. आज प्रधान सचिव पराग जैन यांचे कडे बैठक झाली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वच्छतादूतांना न्याय देणेसाठी प्रशासन गतीमान झाले असल्याचे कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी सांगितले.

कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव, उपाध्यक्ष ऋषिकेश शीलवंत, उपाध्यक्ष बंडू हिवरे, सचिन थोरात, गणेश चव्हाण, निखील रौदाळकर, निवृत्ती शेडगे, संदीप सुखदान, नागपूर बीआरसी संघटनेचे प्रविण तेलतुंबडे, वॉश व पीएमयू चे मोक्षदी बारसकर यांनी आज कर्मचारी यांचे अडचणी मांडल्या.कृती समितीने जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) , जिल्हास्तर कर्मचारी, बीआरसी सीआरसी व वॉश पीएमयु अंतर्गत कर्मचारी यांचे वेतनासाठी आग्रही राहिली.

आकृतीबंध व मॅचचे निर्णयानुसार कायम करणेची मागणी करणेत आली.

**पाणी स्वच्छता कर्मचारी यांचे आंदोलनातील घोषणांनी आझाद मैदान दणाणले..**

मुंबई येथे आझाद मैदानावर पाणी स्वच्छता कर्मचारी यांचे आंदोलनातील घोषणांनी परिसर दणाणून गेला आहे.आझाद मैदानावर साडेचारशेपेक्षा अधिक कर्मचारी यांनी न्यायिक मागण्या साठी घोषणांनी आंदोलन परिसर दणाणून गेला.बंडू हिवरे, नम्राता गोस्वामी, निखील रैदाळकर, सचिन थोरात, कुमार शिंदे, निवृत्ती शेडगे, संदूप सुखदान, डॉ. संजय वाघ, राजा भोसले, बीआरसी सीआरसी चे प्रविण तेलतुंबडे, सुनील सावंत, अनिल निचिते,संपदा बोधनकर , राजेश मोरे, यांनी मार्गदर्शन केले.

**आदेश आलेनंतरच आझाद मैदान सोडणार - रमाकांत गायकवाड**

महाराष्ट्र राज्यातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत स्वच्छ भारत मिशन( ग्रामीण) व जल जीवन मिशन या योजनेमध्ये काम करणारे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय कंत्राटी कर्मचारी यांचे मागील सुमारे पाच महिन्यापासून प्रलंबित मागण्यासाठी शासनाने मानधन दिलेले नाही.महाराष्ट्र न्याय प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांनी ज्या कर्मचाऱ्यांना दहा वर्षे पूर्ण झालेले आहेत त्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय दिलेला आहे.

परंतु तसे न करता या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेळेवर मानधन दिले जात नाही. सर्व मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही अशी माहिती महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय अध्यक्ष कंत्राटी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिली आहे.

# सोलापूरात दोन आजी-माजी आमदारांच्या पत्नी झाल्या झेडपी मेंबर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदा भारतीय जनता पार्टीने आपली एक हाती सत्ता प्रस्थापित केली आहे. भाजपने जास्त जागा जिंकून आपले वर्चस्व राखले आहे.

यामध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत योगायोग असा की,



एक विद्यमान आमदार आणि दुसरे माजी आमदार यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या सदस्य झाले आहेत. त्यामध्ये अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी सचिन कल्याण शेट्टी या चपळगाव जिल्हा परिषद गटातून प्रचंड मताधिक्याने विजयी झाले आहेत.

त्याचबरोबर माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते या सुद्धा दहिगाव जिल्हा परिषद गटातून विजयी झाले आहेत.

एकाच वेळी आजी-माजी आमदारांच्या पत्नी जिल्हा परिषद मध्ये येणे हा बहुतेक जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच झाल्या असावे असे ऐकण्यास मिळते.

# हरित सोलापूर संकल्पनेला प्रारंभ :
# उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेता सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने 'हरित सोलापूर' संकल्पनेअंतर्गत वृक्षारोपण मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांच्या पुढाकारातून आज वृक्षारोपण करून या उपक्रमाची अधिकृत सुरुवात करण्यात आली.

शहर अधिक हरित, स्वच्छ आणि आरोग्यदायी करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारच्या देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. या मोहिमेत केवळ रोपण न करता संवर्धन आणि संगोपनावरही विशेष भर देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



या प्रसंगी महापौर श्री. विनायक कोंड्याल, नगरसेवक जीवन चाबुकस्वार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, उद्यान अधीक्षक स्वप्निल सोलंनकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर तसेच अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर देवकर यांनी मनोगतात सांगितले की, 'वृक्षारोपण हे केवळ फोटोपुरते न राहता त्यांचे जतन आणि संगोपन ही खरी जबाबदारी आहे. भविष्यात सोलापूर अधिक हरित करण्यासाठी सातत्याने अशा मोहिमा राबविण्यात येतील. 'यावेळी माजी महापौर कै. जनार्दन कारमपुरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक झाड लावून त्यांना अभिवादन करण्यात आले.

महापौर विनायक कोंड्याल यांनीही नागरिकांना वृक्षारोपणासोबत संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले.महानगरपालिकेच्या माहितीनुसार, या संकल्पनेअंतर्गत येत्या काळात शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती मोहिमा आणि शाळा-महाविद्यालयांच्या सहभागातून उपक्रम राबविण्यात येणार आहेत. २०२६ पर्यंत एक लाख वृक्षांची लागवड व संवर्धन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

# परीक्षा म्हणजे आयुष्याच्या एका सुंदर प्रवासाची सुरुवात- दादा भुसे

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** परीक्षा म्हणजे आयुष्याच्या एका सुंदर प्रवासाची सुरुवात आहे. त्यामुळे कोणतेही दडपण न घेता उत्सवाच्या भावनेने विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षा 10 फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीच्या परीक्षा 20 फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत.

सर्व विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून, प्रामाणिकपणा हीच त्यांची खरी ओळख आहे. परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा आणि आठवणीत राहणारा टप्पा असून, गेल्या अनेक महिन्यांपासून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी परिश्रमपूर्वक तयारी केली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी अहोरात्र मेहनत घेतली असून, त्या कष्टांना निश्चितच यश मिळेल, असा विश्वास मंत्री भुसे यांनी व्यक्त केला. परीक्षा देताना विद्यार्थ्यांच्या हातात केवळ उत्तरपत्रिका नसून,



त्यात आई-वडिलांची स्वप्नेही असतात, असे सांगून मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवण्याचे, सकारात्मक विचार करण्याचे आणि कोणतेही दडपण न घेता परीक्षा देण्याचे आवाहन केले. परीक्षेच्या काळात आरोग्य जपावे, पुरेशी झोप घ्यावी, सकस आहार घ्यावा, मन शांत ठेवावे आणि परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचावे, यावरही त्यांनी भर दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देताना, कष्टाने, जिद्दीने आणि पालक-शिक्षकांच्या आशीर्वादाने विद्यार्थी स्वतःबरोबरच राज्याचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वासही मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला.

# राज्यात ७० हजार पदांची लवकरच नोकरभरती



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवण्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल.

राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने मांडलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी इतर राज्यांनाही हे सुधारणा मॉडेल स्वीकारण्याचे निर्देश दिले. यामुळे महाराष्ट्र प्रशासन सुधारणा क्षेत्रात देशासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर देण्याच्या सूचना केल्या. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे.

येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील.

यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. यासाठी कोणत्याही विभागाने मागे राहता सर्वांनी एकत्र येऊन प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# विजय उमाकांत राठोड यांचा ऐतिहासिक विजय



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील ११३-कासेगाव गणातून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजय उमाकांत राठोड यांनी दणदणीत विजय संपादन केला आहे.

आज ९ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अंजली प्रशांतसिंह मरोड यांनी त्यांना विजयाचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले.

हा निकाल राजकीय वतुर्ळात विशेष चर्चेचा ठरला आहे, कारण विजय राठोड हे काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते उमाकांत राठोड यांचे सुपुत्र आहेत. उमाकांत राठोड यांनी दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे सभापतीपद भूषवले होते. आपल्या वडिलांचा राजकीय वारसा काँग्रेसमध्ये असतानाही, विजय राठोड यांनी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. कौटुंबिक वारसा आणि भाजपची संघटनात्मक बांधणी यांच्या जोरावर त्यांनी सर्वसाधारण प्रवगार्तून हा विजय खेचून आणला आहे.

कासेगाव गणातील मतदारांनी विजय राठोड यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवल्याने आता या भागात भाजपची ताकद अधिक मजबूत झाली आहे. विजयानंतर समर्थकांनी सोलापूरमध्ये गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. आपल्या वडिलांचा जनसेवेचा वारसा आपण भाजपच्या माध्यमातून समर्थपणे पुढे नेऊ आणि मतदारसंघाच्या विकासासाठी कटिबद्ध राहू, असा विश्वास विजय राठोड यांनी यावेळी व्यक्त केला.

# महापौर कोंड्याल यांनी आ. सुभाष देशमुख यांची घेतली भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी माजी मंत्री व सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी आमदार सुभाष बापू देशमुख यांनी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. महापौरपदाच्या जबाबदारीसाठी त्यांनी शुभेच्छा दिली. या भेटीदरम्यान सोलापूर शहराच्या विकासकामांबाबत, नागरी समस्या, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच आगामी विकासात्मक योजनांवर सकारात्मक चर्चा झाली. महापौर विनायक कोंड्याल यांनी शहराच्या हितासाठी सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली.याप्रसंगी मनिष देशमुख यांनी अन्नपूर्ण योजना सदर्भात महापौर यांना माहिती दिली. यांच्यासह शहरातील नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

# महापौर कोंड्याल यांनी आ. कोठे यांची घेतली सदिच्छा भेट




सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आज सोलापूर मध्यचे आमदार देवेन्द्र कोठे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आमदार देवेन्द्र कोठे यांनी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकाससंदर्भात विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. शहरातील नागरी समस्या, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच विकासकामांना गती देण्यात येईल. यावेळी नगरसेवक मेघनाथ येमूल, नगरसेवक प्रशांत पल्ली,गुरुशांत धुत्तरगावकर, वासुदेव इपलपल्ली, नागेश खरात, बोजराज माने आदी मन्यावर उपस्थिती होते.

# एमआयटी चे डॉ .विश्वनाथ कराड यांनी दिला अन्नछत्राच्या आठवणींना उजाळा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी पुण्याचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांची पुणे येथील कार्यक्रमात अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्याशी प्रदीर्घ चर्चा झाली. यावेळी प्रा. कराड यांनी अन्नछत्र मंडळामध्ये झालेल्या सन्मानाचा आणि तेथील व्यवस्थेच्या पाहणी केल्याच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. कराड म्हणाले की,



कलियुगामध्ये सर्वात मोठे दान हे अन्नदान सांगितले आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेमध्ये देखील शालिवाहन शकांपासून अन्नदानाचे चे अनन्य साधारण महत्व आहे. सध्याच्या काळामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये अन्नदान करणारी महाराष्ट्रात फार मोजकी ठिकाणी आहेत, त्यामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्रलयाचे नाव आहे. मी स्वतः ती संपूर्ण व्यवस्था बघून तेथील आध्यात्मिक अनुभूती घेतली आहे . हे अन्नछत्र केवळ एक भोजन व्यवस्था नाही तर स्वामीप्रति असलेल्या सद्भाव आणि श्रद्धेने ग्रहण करणारे हजारो भाविक भक्त यांच्या अमोल संगमामुळे ते एक 'अन्नतीर्थ ' झाले आहे. जन्मेजयराजे तेथे संस्थापक अध्यक्ष असले तरी त्यांनी एक सामान्य स्वामी भक्त म्हणून आपले आयुष्य या अन्नछत्राच्या आणि तेथील विकास कामांच्या उभारणी करिता वेचले.

तेथे सुरू असणारे फक्त निवासाचे बांधकाम, वेळोवेळी होणारी आरोग्य शिबिरे , सामाजिक कार्यक्रम , सांस्कृतिक कार्यक्रम, गुरुपौर्णिमेचे कार्यक्रम या सर्वांचा मी परामर्श घेत असतो. महाराष्ट्रामध्ये सुरू असलेल्या या कायार्चा मला मनापासून आनंद आहे. प्रा. डॉक्टर कराड यांनी या सर्व कार्याबद्दल जन्मेजयराजे विजयसिंह राजे भोसले यांचे विशेष अभिनंदन केले आणि स्वर्गीय लतादीदींच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने होत असलेल्या भेटीचा आनंद व्यक्त केला.